**अल-निनोच्या पार्श्वभूमीवर आपत्तीकालीन पीक व्यवस्थापन करा : डॉ. देवीकांत देशमुख**
**रहाटी येथे खरीप पूर्व मेळावा; केंद्र व राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती**

रहाटी , ता. जि. नांदेड, दि. ०६/०६/२०२६:

शेती व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार, कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी, नांदेड, तालुका कृषी अधिकारी कार्यालय व आत्मा, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे रहाटी बु., ता. जि. नांदेड येथे 'खरीप पूर्व शेतकरी मेळावा' मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्र पोखर्णी, नांदेडचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. देवीकांत देशमुख होते. प्रमुख पाहुणे म्हणून कृषी कल्याण मंत्रालय, भारत सरकार, प्रादेशिक विभाग नागपूर येथील पीक संरक्षण अधिकारी मा. राम कृष्ण रेड्डी व सहाय्यक पीक संरक्षण अधिकारी मा. शेख पिर उपस्थित होते.

कृषी विभागातर्फे तालुका कृषी अधिकारी मा. श्री संजय चातरमल, कृषी अधिकारी सौ. चातरमल व जिल्हा परिषद कृषी अधिकारी सौ. छाया देशमुख यांच्यासह मंडळ कृषी अधिकारी, सहा. कृषी अधिकारी, BTM आत्मा व कृषी विभागाचे सर्व अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमास सरपंच श्री बोकारे व परिसरातील २५० हून अधिक शेतकरी बांधव उपस्थित होते.

डॉ. देवीकांत देशमुख यांचे मार्गदर्शन: डॉ. देशमुख यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना खरीप हंगाम २०२६ साठी मोलाचे मार्गदर्शन केले.

1. एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन: "केवळ रासायनिक खतांवर अवलंबून न राहता शेणखत, गांडूळखत, हिरवळीचे खत, जिवामृत व ट्रायकोडर्मा यांचा वापर वाढवा. यामुळे जमिनीचा पोत सुधारतो व उत्पादन खर्च ३० टक्के कमी होतो," असे त्यांनी सांगितले.
2. अल-निनो व आपत्तीकालीन पीक व्यवस्थापन: यंदा अल-निनोचा प्रभाव राहण्याचा हवामान खात्याचा अंदाज आहे. त्यामुळे कमी कालावधीची, दुष्काळ सहनशील वाणे निवडावीत. सोयाबीन JS-9305, MAUS-158, फुले संगम; तूर BDN-711; मूग BM-2003-2 या वाणांची शिफारस त्यांनी केली.
3. खताचा संतुलित व काटेकोर वापर: "उगाच एकरी 2 बॅग युरिया टाकू नका. माती परीक्षण अहवालानुसारच नत्र, स्फुरद, पालाश द्यावे. गंधक, झिंक, बोरॉन या सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरून काढा. रासायनिक खताची मात्रा 25% कमी करून जैविक खतांचा वापर वाढवा."
4. आंतरपीक पद्धती: सोयाबीन + तूर 4:2 किंवा 6:3, सोयाबीन + मूग 2:1 या आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा. एक पीक फेल झाल्यास दुसऱ्या पिकातून उत्पन्न मिळते.
5. बियाणे व पेरणी: घरचे बियाणे वापरण्यास प्राधान्य द्यावे, मात्र उगवण क्षमता 80% पेक्षा जास्त आहे का हे तपासावे. 75 ते 100 मि.मी. पुरेसा मोसमी पाऊस झाल्यानंतर व वाफसा आल्यानंतरच पेरणी करावी.
6. नकली निविष्ठांपासून सावधानता: नकली बियाणे, खते व औषधी यापासून सावध राहावे. अधिकृत कृषी सेवा केंद्रातूनच खरेदी करावी व पक्की पावती, GST बिल, बॅच नंबर घेतल्याशिवाय राहू नये, असे आवाहन त्यांनी केले.

कृषी विस्तार तज्ञ डॉ. अमिता क्षत्रिय यांनी महिला शेतकऱ्यांसाठी गटशेती व काढणी पश्चात तंत्रज्ञान यावर मार्गदर्शन केले.केले महिला पुढे आल्या तर घर पुढे नेतात यासाठी महिला या मार्गदर्शनाचा चांगल्या प्रकारे फायदा होईल पीक संरक्षण अधिकारी मा. राम कृष्ण रेड्डी यांनी खोडमाशी व पिवळा मोझॅक नियंत्रण यावर माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सचिन केंद्रे यांनी केले तर आभार BTM आत्मा यांनी मानले.
















खतांच्या संतुलित वापराविषयी
जनजागृती कार्यक्रम
खरीप पूर्व शेतकरी मेळावा


खेत बचाओ अभियान
धरती माता (खेत बचाव) अभियान व


कृषि विभाग
कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), नांदेड
अंतर्गत
धरती माता (खेत बचाव) अभियान व
शेतीवरील दुष्प परिणाम व त्यावरील उपाययोजना
ATMA
स्थळ : राहटी (बु.) ता.जि.नांदेड


कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी, नांदेड-१
खरीप पूर्व शेतकरी मेळावा